सकाळ
05 JUL 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थिनी वसतिगृहावर आता सीसीटीव्हीचा वॉच

कोल्हापूर, ता. ४ : विद्यार्थिनींची छेडछाड होऊ नये, त्यांना सुरक्षितता मिळावी, यासाठी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या वसतिगृह परिसरात तेवीस कॅमेरे बसविल्याने रोडरोमिओंवर चांगलाच चाप बसला आहे.

विद्यापीठाचा परिसर एकूण बाराशे एकरांचा आहे. मुख्य प्रवेशद्वार ते आठनंबर गेटपर्यंतचा आठशे व मुख्य इमारतीसमोर चारशे एकरांचा परिसर

आहे. प्रत्येक ठिकाणी विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा यंत्रणा कार्यरत आहे; पण ती पुरेशी नसल्याने ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले. या ठिकाणी विद्यार्थिनींना चालत जावे लागते. त्यामुळे त्यांची छेडछाड होऊ शकते. ती होऊ नये, यासाठी प्रशासनाने अत्याधुनिक कॅमेरे बसविले आहेत. याबाबत संगणक केंद्राच्या प्रभारी संचालिका स्वाती खराडे म्हणाल्या, ''विद्यापीठात सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कॅमेरे बसविले आहेत. वसतिगृहातील विद्यार्थिनींना कोणताच त्रास होऊ नये, याची दक्षता घेण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार या कॅमेऱ्यांच्या संख्येत वाढ करण्यात येईल.''

ठिकाण	कॅमेरे
मुलांचे वसतिगृह	२३
मुलींचे वसतिगृह	३६
विद्यापीठ इमारत	५०
परीक्षा विभाग १ व २	५०

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स - 5 JUL 2016

अतिरिक्त विद्यार्थी; वाढीव टक्क्यांचा प्रस्ताव द्या

शिवाजी विद्यापीठ आणि प्राचार्य, संस्थाचालकांची बैठक

कोल्हापूर : प्रतिनिधी

अतिरिक्त विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी तुकडीत चाळीस टक्के प्रवेशास परवानगीची मागणी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडे सोमवारी झालेल्या बैठकीत प्राचार्य व संस्थाचालकांकडून करण्यात आली. संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे याबाबत प्रस्ताव सादर करावेत. या प्रस्तावांवर विचार करून परवानगी दिली जाईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या बैठकीस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

बैठकीत प्राचार्य व संस्थाचालकांनी सांगितले की, अजूनही आमच्याकडे प्रवेशासाठी विद्यार्थी वाट पाहात आहेत. त्यांना तत्काळ प्रवेश देता यावा, यासाठी प्रशासनाने तुकडीत चाळीस टक्के प्रवेशास परवानगी द्यावी. अतिरिक्त तुकड्यांनाही मंजुरी देण्यात यावी. अतिरिक्त तुकड्यांचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे. त्यामुळे शासनस्तरावर त्याचा लवकरच निर्णय येईल. चाळीस टक्के प्रवेशाबाबत ज्या महाविद्यालयांना गरज आहे, अशांनी प्रस्ताव सादर करावेत. या प्रस्तावांचा विचार करून परवानगी दिली जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

कुलगुरूपदाच्या कार्यभारास एक वर्ष झाल्याबद्दल बैठकीत डॉ. शिंदे यांचा तसेच बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीस प्राचार्य असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, भैया माने, सतीश घाळी, पी. जी. पाटील, किसन कुऱ्हाडे आदींसह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील बहुतांश प्राचार्य व संस्थाचालक तसेच विद्यापीठ विकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

वाढीव चाळीस टक्के प्रवेश म्हणजे काय?

महाविद्यालयातील एका तुकडीत १२० विद्यार्थी आहेत. संबंधित महाविद्यालयाची १२० पटसंख्येनुसार विविध मंजूर वर्गांचा प्रवेश पूर्ण झाला आहे. अद्यापही त्यांच्याकडे अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केला आहे. या अर्ज केलेल्या अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश नियमानुसार देता येत नाही. अशावेळी मागणी केल्यास विद्यापीठ संबंधित तुकडीत या विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी देऊ शकते. ही परवानगी वाढीव चाळीस टक्के म्हणून दिली जाते. म्हणजेच जर प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांना परवानगी दिली तर १२० पट असणाऱ्या तुकडीत आणखी ४८ विद्यार्थी समाविष्ट होऊ शकतात. मात्र, वाढीव प्रस्तावास मंजुरी देताना नजीकच्या दुसऱ्या महाविद्यालयांवर परिणाम होऊ नये, याची शहानिशा प्रशासनस्तरावर केली जाते. याउलट जादा तुकडीला म्हणजे स्वतंत्र वर्गाला परवानगी हवी असेल तर १२० विद्यार्थ्यांच्या पटाचा निकष पूर्ण करावा लागतो. यासाठी स्टाफ, सोयी आदी सर्वच गोष्टींचा विचार केला जात असल्याने हा विषय सरकारी पातळीवरून मंजूर केला जातो.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सकाळ 05 JUL 2016

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे झालेल्या वृक्षारोपणप्रसंगी उपस्थित मान्यवर.

विद्यापीठ सेवक संघातर्फे वृक्षारोपण

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे अध्यक्ष बाबा सावंत यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त विद्यार्थी भवनाच्या शेजारील जागेत जांभळाच्या ७५ झाडांचे रोपण केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बीसीयूडीचे समन्वयक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एनएसएसचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, सभासद उपस्थित होते.